RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
२६ सोमवार जानेवारी २०२६
✲ वर्ष ५ ✲ अंक २४१
✲ पृष्ठ : ४ ✲ मूल्य रु : ३

प्रजासत्ताक
दिनानिमित्त सर्व नागरिकांना मन:पुर्वक शुभेच्छा!

# गडचिरोली पोलिसांचे शौर्य देशात चमकले

**▸विदर्भ केसरी। गडचिरोली :**

माओवाद्यांविरुद्धच्या लढ्यात जिवाची बाजी लावून अतुलनीय धाडस दाखविणाऱ्या जिल्हा पोलिस दलातील ३१ अधिकारी व जवानांना प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपतींचे 'पोलिस शौर्य पदक' जाहीर झाले.

२०१८ मध्ये गाजलेल्या बोरिया-कसनासूर चकमकीतील ऐतिहासिक शौर्यासाठी हा सन्मान देण्यात आला आहे. याशिवाय ३९४ अंमलदारांना पदोन्नतीची बक्षिसीही मिळाली आहे.

भामरागड तालुक्यातील बोरिया-कसनासूरच्या घनदाट जंगलात २२ एप्रिल २०१८ रोजी सी-६० पथकाने ऐतिहासिक कामगिरी करत ४० माओवाद्यांना कंठस्नान घातले होते. या थरारक मोहिमेत प्रत्यक्ष सहभागी असलेल्या जवानांच्या शौर्यावर आता राष्ट्रपतींची मोहोर उमटली आहे. विशेष म्हणजे, मागील पाच वर्षांत गडचिरोली पोलिसांनी तब्बल २१७ शौर्य पदके पटकावून देशात आपला दबदबा निर्माण केला आहे. यामुळे जिल्हा पोलिस दलाची मान अभिमानाने उंचावली आहे.

पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर अधीक्षक एम. रमेश, कार्तिक मधिरा आणि गोकुल राज जी. यांनी सर्व पदक विजेत्यांचे स्वागत केले आहे.

## यांनी पटकावले शौर्यपदक...

**■ पोलिस निरीक्षक अमोल फडतरे, उपनिरीक्षक मधुकर नैताम, वासुदेव मडावी, सहायक उपनिरीक्षक विलास पोरतेट, हवालदार संतोष नैताम, विश्वनाथ सडमेक, ज्ञानेश्वर तोरे, दिलीप सडमेक, रामसू नरोटे, आनंदराव उसेंडी, राजू चव्हाण, मोहन उसेंडी, संदीप वसाके, पो. ना. अरुण मेश्राम, सुधाकर वेलादी, नितेश वेलादी, विश्वनाथ मडावी, कैलास कोवासे, हरिदास कुलयेटी, किशोर तलांडे, अतुल मडावी, अनिल आलाम, नरेंद्र मडावी, आकाश ऊईके, घिस्सू आत्राम, राजू पुसाली, महेश जाकेवार, रुपेश कोडापे, मुकेश सडमेक, योगेंद्रराव सडमेक व अंमलदार कारे आत्राम यांना राष्ट्रपतींचे शौर्य पदक जाहीर झाले.**

































दैनिक विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
सोमवार, २६ जानेवारी २०२६ | ४



## पाच लाखांच्या साड्या पकडल्या

कोल्हापूर : प्रतिनिधी
कोल्हापूर जिल्ह्यात जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक यंत्रणा सतर्क झाल्याचे चित्र समोर आले आहे. करवीर तालुक्यातील वाशी गावात भरारी पथकाने धाड टाकून तब्बल पाच लाख रुपये किमतीच्या साड्या जप्त केल्याची मोठी कारवाई उघडकीस आली आहे. निवडणुकीच्या तोंडावर अशा प्रकारची कारवाई झाल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली असून, निवडणूक आयोगाच्या पथकांकडून पुढील काळात अशाच धाडी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.


**महत्त्वाचे**



## हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे शंभराव्या जन्मशताब्दी साजरा

**▶विदर्भ केसरी। मंगरूळपीर प्रतिनिधी**

दि.23.01.2026 जानेवारी रोजी हिंदुरुदय बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मोत्सव अनेक ठिकाणी साजरा होत असून शेलुबाजार येथे मुख्य चौकात बस स्टॅन्ड जवळ सती आई रोड पापा हॉटेल समोर हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शंभराव्या जन्मोत्सव शताब्दी निमित्त पंचक्रोशीतील सर्वच शिवसैनिक व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीमध्ये बाळासाहेबांच्या प्रतिमेचे सामूहिक पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकत सर्व परिसरातील शिवसैनिक उपस्थित राहून त्यांचे विचार आत्मसात करून बाळासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन दरम्यान त्यांना विनम्र अभिवादन केले व अनेक उपस्थित शिवसैनिक नागरिकांनी त्यांच्या विचारावर प्रकाश टाकत आपले विचार प्रकट करून त्यांचे कार्य पुढे नेण्याचे कार्य आपण सर्वजण शिवसैनिक म्हणून पुढे नेऊ व त्यांच्या कार्याला उजाळा देऊ हीच आज शंभराव्या जन्मोत्सव शताब्दी निमित्ताने मानवंदना देऊन अभिवादन केले...



## हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी!

**▶विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर बाळापूर**

हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती ठिकठिकाणी उत्साहात साजरी करण्यात आली तर तालुक्यातील वाडेगाव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी अभिवादन केले तसेच उपस्थितांनी हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जिवन कार्याला आपल्या मनोगतातून सविस्तरपणे उजाळा दिला. वाडेगाव येथील ग्रामपंचायत कार्यालय समोर रक्तदान शिबिराचे आयोजन केले असता स्थानिक तसेच परिसरातील युवकांनी मोठ्या संख्येने स्वयंस्फूर्तीने रक्त दान शिबिरात आपला सहभाग नोंदविला. आयोजित रक्तदान शिबीर यशस्वीतेसाठी अरुण पळसकार .दिपक मसने .राजेश्वर पळसकार उपसरपंच. चेतन कारंझकर .संदिप घाटोळ. रणजित अहीर. दत्ता मानकर. निवृत्ती म्हैसने . अय्याज भाई.सह आदी शिव सेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.



## जल जीवन मिशन अंतर्गत केलेल्या खोदकामामुळे नागरीक त्रस्त!

**▶विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर बाळापूर**

तालुक्यातील ग्रामीण भागात गावातील रस्ते जल जीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या वारंवार खोदकामा मुळे नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याने रोष व्यक्त करण्यात येत आहे. नागरिकांना भेडसावत असलेल्या पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना म्हणून ग्रामीण भागात गावोगावी जल जीवन मिशन अंतर्गत गावातील रस्त्याचे खोदकाम करून जल वाहीन्या टाकल्या जात आहेत.तर काही भागात काम पूर्ण झाले असताना ही परत परत रस्त्याचे खोदकाम सुरू असल्याचे चित्र निर्माण झाले आहे त्यामुळे एका वेळेस रस्त्याचे खोदकाम करून काम लगेच पूर्ण का केल्या जात नाही ? असा प्रश्न नागरिकांच्या कडून उपस्थित केला जात आहे. या बाबतीत तालुक्यातील वाडेगाव येथील काही रस्त्याचे परत खोदकाम करून ठेवले असल्याचे चित्र दिसत आहे. तसेच खोदकाम केल्यावर जमीनीतील लोखंडी सळई बऱ्याच ठिकाणी उघड्या पडल्याने अनेक नागरिक तसेच शालेय विद्यार्थ्यांना लोखंडी सळई मुळे इजा झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्याचप्रमाणे रस्त्याच्या मधोमध दोन अडीच फूट खोल खड्डे सुध्दा निदर्शनास येत आहे. रस्त्याच्या मधोमध असलेल्या खड्ड्यात पडून किंवा उघडे पडलेल्या लोखंडी सळई मुळे एखादी गंभीर घटना घडण्याची शक्यता वर्तविण्यात येत असल्याने नागरीकांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त करण्यात येत आहेत त्यामुळे गावातील जल जीवन मिशन अंतर्गत होत असलेली कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## सराफा व्यापाऱ्याला लाखोने लुट्ले

**▶विदर्भ केसरी। माजलगाव:**

शहरातील अनेक सराफा व्यापारी गावोगावी जाऊन सोन्या-चांदीचे दागिने विकण्याचे काम करतात. अशाच एका सराफा व्यापाऱ्याकडून आज(दि.२५) भर दिवसा शस्त्राचा धाक दाखवत ६० लाख रुपयांचे दागिने पळवल्याची घटना घडली आली आहे. या घनटेने शहरातील सर्व सराफा व्यापाऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील हनुमान चौक येथे अमोल पंढरीनाथ गायके यांचे अमोल ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. ते नेहमी आपल्या बाईकवरुन विविध गावांमध्ये जाऊन सोन्या-चांदीच्या दागिन्यांची विक्री करत असतात. आज सकाळी ९ वाजता ते घरातून निघाल्यानंतर, साडेनऊच्या सुमारास तालखेड फाटा परिसरात पोहोचले. तेथून पुढे खेर्डा गावाकडे जात असताना, त्यांच्या पाठीमागून एका चारचाकी वाहनातून अज्ञात चोरट्यांनी पाठलाग सुरू केला.

# हवामान बदल व प्रदूषणाचा दुहेरी तडाखा

## साथीच्या आजारांनी नागरिक जेरीस : दवाखान्यांमध्ये रुग्णांच्या लांबच लांब रांगा .

**▶विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी.**



गेल्या काही दिवसांपासून वातावरणात होत असलेल्या सातत्यपूर्ण बदलांमुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे शहरात साथीच्या आजारांचे सावट पसरले आहे. दिवसभर जाणवणारा उकाडा आणि पहाटे पडणारी थंडी अशा 'मिश्र' हवामानामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. सरकारी आणि खासगी रुग्णालयांमध्ये सर्दी, खोकला, ताप आणि घसा खवखवण्याच्या तक्रारी घेऊन येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली असून ओपीडी फुल्ल झाल्याचे चित्र दिसत आहे. प्रदूषणामुळे श्वसनाचे विकार बळावले वाढत्या बांधकामांची धूळ आणि वाहनांच्या धुरामुळे हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक खालावला आहे. याचा थेट परिणाम सजीव सृष्टीवर होत असून, ज्येष्ठ नागरिक आणि बालकांना श्वसनाचा त्रास जाणवू लागला आहे. हवेतील सूक्ष्म धूलिकणांमुळे फुफ्फुसांचे विकार व ॲलर्जीचे प्रमाण वाढल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. केवळ माणसेच नव्हे, तर पाळीव प्राणी आणि पक्ष्यांवरही या बदलत्या हवामानाचे दुष्परिणाम दिसून येत आहेत. घरोघरी आजारांचे रुग्ण सध्या शहरात विषाणूजन्य तापाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आहे. अनेकांना सततचा खोकला आणि घसा दुखण्याचा त्रास होत असून हा त्रास आठवडाभर रेंगाळत असल्याचे रुग्ण सांगत आहेत. विशेषतः शालेय मुलांमध्ये संसर्ग वेगाने पसरत असल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

### आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला, काय काळजी घ्यावी ?

- वाढत्या आजारांच्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय तज्ज्ञांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.
  मास्कचा वापर करा.घराबाहेर पडताना, विशेषतः गर्दीच्या आणि प्रदूषित ठिकाणी मास्कचा वापर करा. आहार आणि विश्रांती: रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी सकस आहार घ्या आणि पुरेशी विश्रांती घ्या. अंगावर आजार न काढता किंवा घरगुती औषधे न घेता डॉक्टरांचा सल्ला घ्या.- डॉ हरीश पातोंड.मूर्तिजापूर.

### सजीव सृष्टीवरही परिणाम

- हवामानातील या टोकाच्या बदलांमुळे केवळ मानवी आरोग्यच नव्हे, तर झाडे आणि प्राण्यांवरही परिणाम झाला आहे. अकाली फुलोरा येणे किंवा झाडांची पाने गळणे अशा नैसर्गिक प्रक्रिया विस्कळीत झाल्या आहेत, ज्याचा फटका पर्यावरणाच्या साखळीला बसत आहे.

# अपघातील विम्यामुळे कुटुंबाला आधार

## मृतक खातेदाराच्या वारसास 2 लाखांची रक्कम DBT द्वारे खात्यात जमा कुटुंबियांनी मानले बँकेचे आभार

**▶विदर्भ केसरी। विठ्ठल भागवत**



मेडशी: अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकने नाबार्डच्या मार्गदर्शना खाली सामाजिक सुरक्षा योजना प्रभावीपणे राबवत असून या योजनेचा लाभ मालेगाव तालुक्यातिल एका खातेदाराच्या कुटुंबाला मिळाला आहे. मेडशी शाखेचे खातेदार तुकाराम सेवा चव्हाण यांचा शेतात काम करत असताना विद्युत शॉक लागून दुर्दैवी अपघाती मृत्यू झाला होता.

या घटनेची माहिती मिळताच मेडशी शाखेचे शाखाधिकारी श्री जितेंद्र ज्ञानदेव खंडारे यांनी तात्काळ खातेदाराच्या नातेवाईकांशी संपर्क साधून संबंधित खातेदाराची प्रधानमंत्री जीवन सुरक्षा विमा योजना अंतर्गत 2 लाख रुपयांची अपघात विमा पॉलिसी अस्तीत्वात असल्याची माहिती दिली. त्यानंतर वरसदारांकडून आवश्यक क्लेम फॉर्म भरून घेऊन सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली. व हे प्रकरण मुख्य कार्यालयातील प्रफुल पाटील यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले.

बँकेकडून सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर प्रधानमंत्री जीवन सुरक्षा विमा योजना अंतर्गत 2 लाख रूपयांचा विमा दावा मंजूर करण्यात आला. मंजूर रक्कम DBT द्वारे अपघातातील मृत खातेदारांच्या पत्नी श्रीमती गौकर्णा तुकाराम चव्हाण यांच्या खात्यात जमा झाल्याचे पत्र बँकेचे संचालक श्री दिलीपराव जाधव साहेब यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी तालुका प्रमुख श्री कैलास बिसकुंदे, मार्केटिंग अधिकारी श्री देवानंद सुर्वे, शाखाधिकारी श्री जितेंद्र खंडारे रोखपाल श्री संदीप खुळे, लिपिक समीक्षा बोरसे, लिपिक पुजा इंगळे व कर्मचारी संतोष साठे तसेच गावातील संतोष तयाडे, वैभव साठे उपस्थित होते.

कुटुंबातील कर्ता व्यक्ति गमावल्याने वारसदारांसमोर आर्थिक संकट उभे राहिले होते. मात्र बँकेमार्फत प्रधानमंत्री जिवण सुरक्षा विमा योजनेचा लाभ मिळाल्याने कुटुंबाला मोठा आधार मिळाल्याची भावना वारसदारांनी व्यक्त केली. या वेळी त्यांनी बँकेचे अध्यक्ष मा. श्री संतोषदादा कोरपे साहेब, संचालक मंडळ तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री अनंत वैध यांचे आभार मानले.

दरम्यान जास्तीजास्त खातेदारांनी सामाजिक सुरक्षा धोरणाचा लाभ घ्यावा असे आव्हान बँकेकडून करण्यात आले आहे. या संवेदनशील व तत्पर कार्यवाही बाबदल जिल्हा भरातून दि अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कौतुक होत आहे.

## रुग्णवाहिका दिसताच सिग्नल सुरू!

**▶विदर्भ केसरी। नागपूर,**

पृथ्वीतलावरील प्रत्येक व्यक्तीचा जीव अमूल्य आहे. अशा अमूल्य जीवावर एखादे संकट आल्यास त्याला रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेण्याची गरज पडते. अनेकदा वाहतूक कोंडीमुळे पीडित रुग्ण रुग्णालयात जाऊच शकत नाही. परिणामी तो वैद्यकीय उपचाराविना वाटेतच यमाघरी जातो. पण यापुढे असे प्रकार थांबतील. कारण महाराष्ट्रात सुमारे 869 ब्लॅक स्पॉटवर उपाय म्हणून आयटीएमएस या तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. यामुळे रुग्णवाहिका दिसताच सिग्नल सुरू होईल. परिणामी रुग्णवाहिकेचा समोर जाण्याचा मार्ग मोकळा होईल अन् पर्यायाने रुग्णाला उपचार मिळून तो वाचेल. इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम अर्थात आयटीएमएस ही एक आधुनिक तंत्रज्ञान आधारित वाहतूक व्यवस्थापन प्रणाली आहे. यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक कॅमेऱ्यांचा वापर करून वाहतूक कोंडी कमी करण्यावर भर दिला जातो. त्यानुसार रस्त्यावरील वाहनांची गर्दी पाहून सिग्नलचा वेळ निश्चित होईल. यात सिग्नलचा वेळ आपोआपच कमी किंवा जास्त केला जातो. ही यंत्रणा मानवी हस्तक्षेपाशिवाय काम करते. दरम्यान, अनेकजण सिग्नल तोडतात. वेगमर्यादा ओलांडून वाहन चालवितात. चुकीच्या बाजूने गाडी चालवितात. यामुळे अपघात घडतात. अशा वाहनांचा क्रमांक टीपून त्यांना ई-चालान तत्काळ पाठविले जाईल. महाराष्ट्रातील 36 जिल्ह्यांमध्ये एकूण 21 हजार 400 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांवरील 869 अपघात प्रवण क्षेत्रांवर ऊर्जा स्त्रोतांचा वापर करून फोर जी/फाईव्ह जी मोबाईल टेक्नॉलॉजी आधारित वायरलेस अशी एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली आयटीएमएस यंत्रणा बसविण्यात येणार आहे. याकरिता सुमारे 923.05 कोटी रुपये खर्च येणार आहे. याकरिता प्रथम 81 कोटी रुपयांच्या प्रस्तावास नुकतीच शासनाने मान्यता दिली आहे. पश्चिम महाराष्ट्र व कोकणात 315.54 कोटी रुपये अपेक्षित आहे. तर मराठवाड्यात 314 कोटी रुपये आणि विदर्भात 232.55 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

यात वीज जोडणीसाठी 60 कोटी रुपये खर्च आहे. त्यानुसार हा प्रकल्प कार्यान्वित केला जाणार आहे. एकंदरीत पाहता अपघात टाळण्यासाठी टाकलेले पाऊल कौतुकास्पद आहे. फक्त आता 'वेगाला आवरा अन् जीवाला सावरा' हा मंत्र सर्वांनीच प्रत्यक्ष अंमलात आणावा. तेव्हाच सकाळी घरातून निघालेला माणूस सायंकाळी सुखरूप घरी जाईल.

## एक्स बॉयफ्रेन्डच्या पत्नीला टोचलं HIV पॉझिटिव्ह इंजेक्शन

**▶विदर्भ केसरी।**

आंध्र प्रदेशातील कुरनूलमध्ये अत्यंत खळबळजनक घटना घडली. आपल्या एक्स बॉयफ्रेन्डने दुसऱ्या महिलेशी लग्न केल्याचा राग मनात धरून, एका महिलेने चक्क त्याच्या डॉक्टर पत्नीला एचआयव्ही पॉझिटिव्ह रक्ताचे इंजेक्शन दिल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपी महिलेसह एका नर्सला आणि तिच्या दोन मुलांना अटक केली आहे.

पीडित महिला कुरनूलमधील एका खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. ९ जानेवारी रोजी दुपारी २:३० च्या सुमारास ती आपल्या स्कूटरवरून घरी परतत असताना, विनायक घाट परिसरात दुचाकीवरून आलेल्या दोन तरुणांनी मुद्दाम तिच्या स्कूटरला धडक दिली. या अपघातात डॉक्टर महिला जखमी होऊन खाली पडली. त्याच वेळी, मुख्य आरोपी बी. बोया वसुंधरा (वय, ३४) हिने मदतीचा बहाणा करत तिथे धाव घेतली. पीडितेला रिक्षात बसवत असताना, वसुंधरा गुपचूप तिला एचआयव्ही पॉझिटिव्ह रक्ताचे इंजेक्शन टोचले. पीडितेने वेदनेने ओरडताच सर्व आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, वसुंधरा ही पीडितेच्या पतीची एक्स गर्लफ्रेन्ड होती. आपल्या प्रियकराने दुसऱ्याशी लग्न केल्याचे ती सहन करू शकली नाही आणि त्यांना वेगळे करण्यासाठी तिने हा कट रचला. या कटात तिला कोंग ज्योती नावाच्या एका परिचारिकेने साथ दिली. या नर्सने सरकारी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांकडून संशोधनाचे कारण सांगून एचआयव्ही पॉझिटिव्ह रक्ताचे नमुने गोळा केले. हे संक्रमित रक्त काही दिवस रेफ्रिजरेटरमध्ये साठवून ठेवण्यात आले होते, जे नंतर अपघाताचे नाटक करून पीडितेच्या शरीरात इंजेक्शनद्वारे सोडण्यात आले.

# कुरूम जिल्हा परिषद सर्कलमधून बाबूभाऊ देशमुख यांना सर्व धर्मियांचा वाढता पाठिंबा

## विकासाभिमुख नेतृत्वाला, निवडून देण्यासाठी मतदारांचा कौल.

**▶विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



येणाऱ्या जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर कुरूम सर्कलमध्ये राजकीय घडामोडींना वेग आला आहे. भारतीय जनता पार्टीचे इच्छुक उमेदवार बाबूभाऊ देशमुख यांच्या कार्याचा धडाका आणि जनसंपर्क पाहता, मतदारसंघातील सर्व जाती-धर्माच्या लोकांकडून त्यांना उत्स्फूर्त आणि ठाम पाठिंबा मिळत आहे. पक्षाचे संघटन व विकासाचा अजेंडा तळागाळापर्यंत पोहोचवण्यात बाबूभाऊंचे नेतृत्व यशस्वी ठरत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे. आमदार-खासदारांच्या मार्गदर्शनात समाजकार्याचा वसा बाबुभाऊ देशमुख हे आमदार हरिशभाऊ पिंपळे व खासदार अनुपभाऊ धोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघात अहोरात्र कार्यरत आहेत. केवळ निवडणुका डोळ्यासमोर न ठेवता, वर्षभर सामाजिक बांधिलकी जपत पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांच्या याच कार्यक्षमतेमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

कुरूम सर्कलमध्ये बाबूभाऊंची ओळख एक 'विश्वासार्ह नेतृत्व' म्हणून आहे. प्रशासकीय कामांचा गाढा अनुभव आणि सामान्य जनतेशी असलेला थेट संपर्क ही त्यांची जमेची बाजू ठरत आहे. "जाती-पातीचे राजकारण न करता, रात्री-अपरात्री जनतेच्या सुखा-दुःखात धावून जाणारा नेता" अशी त्यांची जनमानसात प्रतिमा निर्माण झाली आहे.

बाबुभाऊंना असलेल्या प्रशासकीय माहितीचा आणि अनुभवाचा कुरूम सर्कलच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चितच उपयोग होईल, असा विश्वास त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केला जात आहे. रस्ते, पाणी, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर त्यांची पकड असल्याने मतदारांचा कल त्यांच्याकडे झुकताना दिसत आहे. बाबुभाऊ देशमुख यांच्या स्वच्छ प्रतिमेमुळे व विकासकामांच्या ध्यासामुळे मी माझ्या सर्व सहकारी कार्यकर्त्यांसह त्यांना जाहीर पाठिंबा देत आहे. भारतीय जनता पार्टीची धोरणे घराघरांत पोहोचवण्यासाठी त्यांचे नेतृत्व सक्षम आहे. कुरूमच्या प्रगतीसाठी सर्व मतदारांनी एकजुटीने त्यांच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन मी करत आहे.
शरद गाडगे
कुरूम, सहकारी कार्यकर्ते व समर्थक

### निवडणुकीच्या रिंगणात 'बाबुभाऊ' फॅक्टर निर्णायक?

भाजपची मजबूत संघटनात्मक शक्ती व बाबुभाऊंचा वैयक्तिक करिष्मा यामुळे कुरूम सर्कलमध्ये विरोधकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. सर्वधर्मीय जनतेचा वाढता पाठिंबा पाहता, २०२६ च्या या निवडणुकीत बाबुभाऊ देशमुख हे कुरूम सर्कलच्या विकासाचे नवे पर्व सुरू करतील, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# मनरेगा कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत प्रशासनाकडे साकडे

## दर्यापूरच्या तहसीलदारांना निवेदन

**▶विदर्भ केसरी। दर्यापूर**



महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) / व्ही.बी.जी. रामजी योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्या तातडीने मंजूर करण्यात याव्यात, यासाठी महाराष्ट्र सहाय्यक कार्यक्रमाधिकारी, तांत्रिक सहाय्यक, क्लर्क कम डाटा एन्ट्री ऑपरेटर संघटनेच्या वतीने दर्यापूर तहसीलदारांना नुकतेच लेखी निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात किमान दहा वर्षे व त्याहून अधिक सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्यात यावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच कंपनीमार्फत दिनांक 30 डिसेंबर 2025 रोजी डिस्कन्टिन्यू आदेश प्राप्त झाले असून, अद्याप नवीन आदेश प्राप्त न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे बाह्य संस्थेमार्फत नवीन नियुक्ती न करता, योजनेत कार्यरत जेष्ठ कर्मचाऱ्यांनाच राज्य निधी असोसिएशनमार्फत नियुक्ती आदेश देण्यात यावेत, जेणेकरून शासनाचा सुमारे 17 टक्के निधी वाचेल, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर या तीन महिन्यांचे चालू वर्षातील मानधन सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना तातडीने अदा करण्यात यावे, तांत्रिक सहाय्यकांचे मानधन एस.एन.ए. प्रणालीद्वारे न करता पूर्वीप्रमाणे जुन्या पद्धतीने देण्यात यावे, तसेच एम.आय.एस., पी.एम., ए.पी.ओ., सी.डी.ई.ओ. कर्मचाऱ्यांना सी.एस.सी. कंपनीकडील जुना प्रवास भत्ता मिळावा, अशीही मागणी निवेदनात नमूद करण्यात आली आहे. तसेच जेष्ठ कर्मचारी व नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या मानधनातील तफावत दूर करण्यात यावी, तसेच मागील वर्षातील काही महिन्यांचे प्रलंबित दिवसांचे मानधन तात्काळ अदा करण्यात यावे, अशा विविध मागण्या निवेदनाद्वारे मांडण्यात आल्या आहेत. हे निवेदन दर्यापूर तहसीलदारांना जिल्हाध्यक्ष सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, जिल्हाध्यक्ष तांत्रिक सहाय्यक, जिल्हाध्यक्ष क्लर्क कम डाटा एन्ट्री ऑपरेटर यांच्यासह मनोज दैवते, अभिलाषा सावंत, पुनम जटाळे व मंगेश चौधरी यांनी सादर करून कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याची विनंती केली आहे.

दैनिक **विदर्भ केसरी** विदर्भाचा मानबिंदू

सोमवार, २६ जानेवारी २०२६ 



## महसूल विभागाची धडक कारवाई, ट्रॅक्टर जप्त

राळेगाव: तालुक्यातील बरडगाव ते राळेगाव रोडवर महसूल विभागाने अवैध रेती वाहतुकीवर कारवाई केली आहे. मंडल अधिकारी गाईड चव्हाण यांनी रात्रीच्या सुमारास गस्त घालत असताना एक विना क्रमांकाचा ट्रॅक्टर पकडला. या ट्रॅक्टरमध्ये ७,००० रुपये किमतीची १ ब्रास रेती चोरून नेली जात होती. महसूल विभागाने ५,५०,००० रुपयांचा ट्रॅक्टर-ट्रॉली आणि रेती असा एकूण ५,५७,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी पवन प्रभाकर ठाकरे याच्याविरुद्ध खान खनिज आणि पर्यावरण अधिनियमाच्या विविध कलमान्वये राळेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# मातोश्री वृद्धाश्रमात अन्नदान, चादर वाटप

## कै. चिंतामणी पांडे यांच्या जन्मदिनानिमित्त सामाजिक उपक्रम

**विदर्भ केसरी। यवतमाळ,**

बाळासाहेब पांडे नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. चिंतामणी पांडे यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून, निळोणा येथील मातोश्री वृद्धाश्रमात गरजू ज्येष्ठ नागरिकांना अन्नदान व चादर वाटप करण्यात आले.

आपल्या लाडक्या अध्यक्षाचा विचारांचा वारसा जोपासत एका भावपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम पार पडला. चिंतामणी पांडे यांचे चार महिन्यांपूर्वी निधन झाले असले, तरी त्यांच्या कार्याची शिदोरी आणि संस्थेबद्दलची निष्ठा आजही अधिकारी, कर्मचाèयांना प्रेरणादायी आहे. संस्थेचा आधारस्तंभ असलेल्या आपल्या नेत्याची आठवण म्हणून केवळ उत्सव न साजरा करता, सामाजिक बांधिलकी जपण्याचा निर्णय पतसंस्थेतर्फे घेण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात कै. चिंतामणी पांडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून आपल्या दिवंगत अध्यक्षांना श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी बोलताना कवडूजी नगराळे यांनी स्व. पांडे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, चिंतामणीभाऊंनी केवळ संस्था उभी केली नाही, तर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदत कशी पोहोचेल याचा विचार केला. त्यांचा सेवाभाव हाच आपल्या सर्वांसाठी मार्गदर्शक आहे. मातोश्री वृद्धाश्रमातील वृद्ध माता-भगिनी आणि बंधूंना थंडीच्या दिवसांत दिलासा मिळावा या उद्देशाने चादर वाटप करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते हे वाटप पार पडले. या छोट्याशा प्रयत्नातून वृद्धांच्या चेहèयावर समाधान पाहायला मिळाले.

स्व. चिंतामणी पांडे यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न येणारी आहे. त्यांना श्रद्धांजली अर्पण करताना बँकेचे कार्यकारी अध्यक्ष अमोल बोदडे, सूर्यकांत वैद्यवार, बादल राठोड आणि राजेश निशाने यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी त्यांच्या चेहèयावर दु:खाचा डोंगर आणि बोलताना होणारी ओढाताण त्यांच्यातील जिव्हाळा स्पष्टपणे दर्शवत होता. मान्यवरांनी सांगितले की, जरी चिंतामणीभाऊ आज आपल्यात शारीरिकदृष्ट्या नसले, तरी ते आमच्या प्रत्येकाच्या हृदयात कायम राहतील. त्यांच्या जाण्याने जे नुकसान झाले आहे, त्याची उणीव पावलोपावली भासत आहे. त्यांच्या आठवणी हीच आमची शिदोरी आहे.

भाऊंनी कधीही कोणाला रिकाम्या हाताने परत पाठवले नाही. संकटात सापडलेल्या प्रत्येकासाठी ते नेहमी धावून जात असत. केवळ कामाच्या ठिकाणीच नव्हे, तर वैयक्तिक आयुष्यातही त्यांनी अनेकांना योग्य दिशा दाखवली. त्यांची उणीव प्रत्येक क्षणी जाणवते, अशीही भावना त्यांनी व्यक्त केली. या सेवाभावी उपक्रमाला सुभाष अतकर, अशोक ठोकळ, संजय भोयर यांचीही प्रमुख उपस्थिती होती. पतसंस्थेचे सर्व अधिकारी, पदाधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी, वृद्धाश्रम व्यवस्थापन आणि सहकार्य करणाèया सर्वांचे आभार मानण्यात आले.

## महत्त्वाचे

### खुनाचा प्रयत्न, चाकूने हल्ला

**विदर्भ केसरी। यवतमाळ :**

शहरातील भारत सेवा आखाड्याच्या मागे असलेल्या सरकारी स्वच्छतागृहाजवळ एका ४५ वर्षीय व्यक्तीवर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना घडली आहे. फिर्यादी लक्ष्मण राजेश श्रीवास यांचा पुतण्या प्रमोद श्रीवास हा परिसरात गेला असता, जुन्या वादातून आरोपी रेहान खान ऊर्फ शाहु आणि छोटू ऊर्फ मुर्गी यांनी संगणमत करून त्याला अडवले. आरोपींनी जीवे मारण्याच्या उद्देशाने प्रमोदच्या पोटावर आणि छातीवर चाकूने सपासप वार करून त्याला गंभीर जखमी केले. याप्रकरणी यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### क्रिकेट सामन्यात वाद, तरुणाला मारहाण

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

: ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत रुई येथील वसंतराव नाईक विद्यालयात क्रिकेट सामन्यादरम्यान खेळाडूंमध्ये राडा झाला. दुपारी क्रिकेट मॅच सुरू असताना धावा (रन्स) लिहिण्याच्या कारणावरून आरोपी मनोज पंजाबराव भटकर याने फिर्यादी राहुल सुभाषचंद्र खर्चे यांच्याशी वाद घातला. वादाचे रूपांतर मारहाणीत झाले असून, आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करत जमिनीवर पाडले आणि उजव्या खांद्यावर तसेच हाताच्या कोपराला गंभीर दुखापत केली. तसेच जीवे मारण्याची धमकीही दिली. पोलिसांनी याप्रकरणी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### वाहनांतून बॅटरी आणि साउंड सिस्टीमची चोरी

**विदर्भ केसरी। दारव्हा:**

तालुक्यातील दहेली ग्राम येथे अज्ञात चोरट्यांनी दोन वाहनांमधील साहित्यावर डल्ला मारला आहे. फिर्यादी गणेश गजानन भारती यांच्या वाहनातील (२प् २९˝E ९९९९) ८,००० रुपये किमतीच्या 'एक्साईड' कंपनीच्या दोन बॅटरी आणि ४,००० रुपयांची साउंड सिस्टीम लंपास करण्यात आली. याच रात्री गावातील शुभम राऊत यांच्या मालकीच्या दुसऱ्या वाहनातूनही ८,००० रुपयांच्या दोन बॅटरी चोरल्या गेल्या. एकूण २०,००० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याची तक्रार फिर्यादीने दारव्हा पोलीस ठाण्यात दिली असून, अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भरधाव दुचाकीच्या धडकेत पादचारी गंभीर जखमी

**विदर्भ केसरी। आर्णी:**

पोलीस ठाण्यांतर्गत दत्तरामपूर येथे रस्ते अपघाताची घटना घडली आहे. फिर्यादी गजानन उखणराव तीरपुडे यांचा धाकटा भाऊ संजय तीरपुडे हे पायी जात असताना, समोरून येणाऱ्या दुचाकीने (२प् २९ Aए ०७१४) त्यांना जोरदार धडक दिली. आरोपी संजय शेषराव कुडवे हा आपली दुचाकी अत्यंत भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवत होता. या धडकेत संजय तीरपुडे यांना गंभीर दुखापत झाली आहे. पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध निष्काळजीपणाने वाहन चालवल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

### जुन्या वादातून लाकडी काठीने मारहाण

**विदर्भ केसरी। दिग्रस:**

तालुक्यातील वसंतपूर खेडा येथे किरकोळ कारणावरून एका व्यक्तीला बेदम मारहाण करण्यात आली. फिर्यादी सुनील विठ्ठलराव वनेरकर यांच्या घरासमोर आरोपी पांडुरंग रोडेकर, बाळकृष्ण रोडेकर आणि विशाल रोडेकर यांनी शिवीगाळ केली. फिर्यादीने शिवीगाळ करण्याचे कारण विचारले असता, आरोपींनी संगणमत करून वाद घातला आणि लाकडी काठीने सुनील यांच्या उजव्या हातावर प्रहार करून त्यांना जखमी केले. आरोपी नेहमीच छोट्या कारणावरून वाद घालत असल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे. दिग्रस पोलिसांनी या घटनेचा गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध रेती वाहतुकीवर पोलिसांचा छापा

पांढरकवडा :यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेने पांढरकवडा पोलीस स्टेशन हद्दीत दहेली तांडा रोडवर मोठी कारवाई केली आहे. विनापरवाना अवैध रेतीचे उत्खनन करून वाहतूक करणारा एक विना क्रमांकाचा महिंद्रा ट्रॅक्टर आणि ट्रॉली पोलिसांनी जप्त केली. या कारवाईत ६,००,००० रुपये किमतीचा ट्रॅक्टर आणि ८,००० रुपयांची एक ब्रास रेती असा एकूण ६,०८,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. पोलीस कर्मचारी खंडाळे यांच्या फिर्यादीवरून आरोपी विलास आगीलकर याला ताब्यात घेण्यात आले असून, त्याचा साथीदार प्रवीण याडगुरे सध्या फरार आहे.

### दोन वाहनांसह ७ लाखांचा माल जप्त

पांढरकवडा: येथील पारवेकर कॉलेजसमोर पोलिसांनी अवैध रेती तस्करी रोखण्यासाठी दुसरी कारवाई केली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एक पिकअप (२प् १३ R ८१२७) आणि एक अशोक लेलँड 'बडा दोस्त' (२प् ३०˝D ७४७१) ही दोन वाहने पकडली. या वाहनांमधून दीड

# इंदिरा महाविद्यालयात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा

**विदर्भ केसरी। कळंब(ता. प्रतिनिधी):-विरेंद्र चव्हाण**

कळंब:-स्थानिक इंदिरा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पवन मांडवकर तर प्रमुख वक्ते प्राध्यापक नीलकंठ नरुले होते. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षा नियमांविषयी जनजागृती करणे व सुरक्षित वाहतुकीचे महत्त्व अधोरेखित करणे हा होता. महाविद्यालयाच्या सिंधू सभागृहात आयोजित या कार्यक्रमात रस्ता अपघातांची कारणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना




तसेच नागरिकांची जबाबदारी यावर मार्गदर्शन करण्यात आले. प्रा. नीलकंठ नरुले यांनी रस्ता सुरक्षेचे नियम पाळल्यास अपघातांचे प्रमाण निश्चितच कमी होऊ शकते, असे प्रतिपादन केले. तसेच तरुणांनी स्वतः सुरक्षित राहून समाजासाठी आदर्श निर्माण करावा, असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांनी अध्यक्षीय भाषणात वाहन चालविताना शिस्त, वेगमर्यादा पाळणे, हेल्मेट व सीट बेल्टचा वापर यांचे महत्त्व स्पष्ट केले. या कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. कैलाश नेमाडे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. सखाराम सांगळे यांनी केले. कार्यक्रमास डॉ. माधुरी राखुंडे, डॉ. प्रशांत जवादे, डॉ. वीरा मांडवकर, डॉ. शीतल राऊत, डॉ. दशरथ चव्हाण, प्रा. स्नेहल खांडेकर, प्रा. राहुल सिन्हा, प्रा. जवाहर बोदुलवार, डॉ. विकी वाटकर, प्रा. गौरव गोटे आदी प्राध्यापक उपस्थित होते. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणारा ठरला.

# मार्कडा जि. प. मराठी शाळेत 'बाल आनंद मेळावा'

**विदर्भ केसरी। कळंब (ता. प्रतिनिधी):-विरेंद्र चव्हाण**

कळंब :-कळंब पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद मराठी शाळा, मार्कडा येथे २२ जानेवारी २०२६ रोजी बाल आनंद मेळावा उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमधील कल्पकता, आत्मविश्वास आणि सहभाग वाढावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात विविध स्वयंपाकीय पदार्थांचे स्टॉल्स लावण्यात आले होते. शाळेचे अंगण दिवसभर विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने गजबजले होते.मेळाव्याचे उद्घाटन पालक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ मोठ्या



संख्येने उपस्थित होते. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या पदार्थांचे सादरीकरण करत विक्रीचा अनुभव घेतला. यामुळे त्यांच्यात व्यवहारज्ञानासह संघभावना आणि स्वावलंबनाची भावना निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक वैशाली उईके (मंगाम), शीतल चौधरी शिक्षकवृंद तसेच ग्रामस्थ महिला पालक वर्ग आदी उपस्थित होते. बाल आनंद मेळाव्याच्या माध्यमातून शिक्षणासोबतच जीवनकौशल्यांची जाणीव करून देण्याचा प्रयत्न शाळेने केल्याबद्दल पालक व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**विदर्भ केसरी। प्रतिनिधी**

**यवतमाळ** मोहदा येथील नाथानी नगर परिसरातील नाथानी इंग्लिश मीडियम स्कूल येथे शुक्रवार, दिनांक 24 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी 6.30 वाजता वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख माननीय हरिहर भाऊ लिंगनवार यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष माननीय ॲड. प्रफुल भाऊ चव्हाण उपस्थित होते.

यावेळी मोहदा गावचे तंटामुक्ती अध्यक्ष तुषार भाऊ गबराणी, आदिवासी जिल्हाध्यक्ष बळवंत मडावी, खोजा समाजाचे अध्यक्ष राजूभाई कडीवार, शिवसेना शहरप्रमुख शेरू शेठ हिराणी, डॉ. ढवडे, विनोद भाऊ भोकटे, डॉ. मुमताज खान पठाण, नितीन नंदुरकर, वलीयानी मॅडम, संतोष वर्मा, अनिल जवादे, संध्या ताई गबराणी पाटील, भाजपाचे अजित गिलानी, विशाल एलोरे, पप्पू सिंग काळे, चेतन बागडे, निलेश रोटे यांच्यासह अनेक मान्यवर व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच पालकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते. उद्घाटक हरिहर भाऊ लिंगनवार यांनी आपल्या भाषणात नाथानी परिवाराचे मनापासून कौतुक केले. नाथानी परिवाराशी आपले घरगुती संबंध असून भविष्यातही हे संबंध कायम राहतील, असे त्यांनी सांगितले. तर प्रमुख पाहुणे ॲड. प्रफुल भाऊ चव्हाण यांनी शाळेच्या सातत्यपूर्ण प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत संस्थेला व नाथानी परिवाराला नेहमीच संपूर्ण सहकार्य राहील, असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष अजीज नाथानी यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन सचिव अमिन नाथानी व सलीमा नाथानी यांनी केले, तर आभार प्रदर्शन यास्मिन नाथानी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिराज नाथानी, अयाज नाथानी, आफ्रीन नाथानी, सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी वर्ग, पालकवर्ग व हितचिंतकांनी मोलाचे सहकार्य केले.

# या शिवजयंतीला यवतमाळमध्ये विदर्भातील सर्वात भव्य रक्तदान शिबिराचा संकल्प...

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

यवतमाळ,दि.२५ जानेवारी... सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीची दुसरी बैठक (शनिवार),दिनांक २४ जानेवारी रोजी महसूल कर्मचारी संस्था,जिल्हा सत्र न्यायालयासमोर,यवतमाळ येथे सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती-२०२६ चे स्वागताध्यक्ष प्रदीप वादाफाळे,व मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष तथा सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.या बैठकीत आगामी शिवजयंती महोत्सवाच्या नियोजनासह विविध जबाबदाऱ्या व समाजोपयोगी उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही छत्रपती शिवाजी



महाराजांच्या जयंतीनिमित्त दिनांक १९ फेब्रुवारी रोजी शिवतीर्थ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर,गार्डन रोड,यवतमाळ येथे 'सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती,यवतमाळ यांच्या वतीने संभाजी ब्रिगेड,यवतमाळ यांच्या माध्यमातून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून समाजहिताची जाणीव ठेवून राबविण्यात येणारा हा उपक्रम शिवजयंतीचे सामाजिक वेगळेपण अधोरेखित करत आला आहे. बैठकीदरम्यान बोलताना प्रा.पंढरी पाठे यांनी सांगितले की,शिवजयंतीच्या निमित्ताने जिल्ह्यातील ग्रामीण-शहरी रुग्णांची रक्ताची गरज लक्षात घेता,यंदाचे रक्तदान शिबिर हे विदर्भातील आतापर्यंतचे सर्वाधिक मोठे रक्तदान शिबिर ठरेल,असा ठाम संकल्प या बैठकीत व्यक्त करण्यात आला. यासाठी सर्व स्तरातील नागरिकांचा सहभाग मिळावा,यासाठी व्यापक पातळीवर नियोजन करण्यात येत आहे. या रक्तदान शिबिरासाठी प्रकल्प प्रमुख म्हणून संभाजी ब्रिगेड,यवतमाळ जिल्हाध्यक्ष अभिलाष खंडारे,कॉम्रेड सचिन मनवर,कृष्णा पुसनाके,प्रद्युम्न जवळेकर तसेच प्रा.पंढरी पाठे यांची प्रमुख भूमिका असणार आहे. यावेळी साहेबराव जुनघरे साहेब,प्रा. सुनील कडू,नीरज डफडे,सचिन डफडे,शशिकांत खडसे,ॲड.जयसिंग चव्हाण,ॲड.सीमा तेलंगे,शोभा पारधी,दत्तू पारधी,स्नेहल रेचे,पंकज राऊत,पंकज इंगळे,अजय गावंडे,महेंद्र वेरुळकर,किशोर राऊत,नरेंद्र बाहेकर,अभिजीत पवार,परसराम कदम,अशोक महल्ले,सृष्टी दिवटे,श्वेता दिवटे,नितीन काळे,कैलास भोयर,अनिकेत आगलावे,आदित्य यादव,श्रीजीत डफडे,गौरव धवस,किशोर चव्हाण,प्रशांत कराळे,विजय निकम,उल्हास रणनवरे,संभाजी भिवकर,योगीराज अरसोड,मनोज झाडे,संजय कोल्हे,संजय पाटील,बाबाराव इंगोले,विशाल चुटे,विजय ठाकरे,हरीश कुडे,प्रशांत ठाकरे,आदी शिवप्रेमिंची उपस्थिती लाभली.

# गुलाम नबी आझाद उर्दू हायस्कूल व ज्युनियर मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा.

## अभियाना अंतर्गत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

दिनांक : 24/01/2026 गुलाम नबी आझाद उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स अँड आर्ट्स पुसद मध्ये आज मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. हा उपक्रम 14 ते 24 जानेवारी पर्यंत विद्यालयात विविध मराठी भाषा संवर्धनाचे उपक्रम घेण्यासाठी होता. त्या अनुषंगाने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन शाळेत करण्यात आले. यात




विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या एकूण पंचवीस विषयावर मराठी भाषेत उत्कृष्ट असे भाषण सादर केले.या कार्यमाचे अध्यक्ष मा.अमित बोजेवार साहेब (विस्तार अधिकारी) तर प्रमुख पाहुणे डॉ.भालचंद्र देशमुख (प्राचार्य,गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय), ॲड.तन्वीर खान (माजी विद्यार्थी) होते व तारिक अहेमद खान सर (ज्येष्ठ शिक्षक)होते. तर मार्गदर्शक म्हणून मोहम्मद सादिक शेख सर (मुख्याध्यापक) होते तर कार्यक्रमाचे आयोजन उपक्रमशील शिक्षक व मराठी भाषण शिक्षक सैय्यद सलमान होते. त्यांनी शाळेतील उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांना भाषण स्पर्धेसाठी उत्कृष्ट तयारी करून घेतली त्यामुळे विद्यार्थ्यांनी विषयानुसार खूपच प्रभावी मांडणी आपल्या भाषण सादर केले.विद्यार्थ्यांचे भाषण प्रदर्शन व कार्यक्रमाचे नियोजन हे सुंदर आल्याचे मत आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांचे मराठीतील विषयानुसार स्पष्ट उच्चारण, योग्य देहबोल, आत्मविश्वास बघून अभिमान व्यक्त केला आणि कौतुक केले.तसेच उत्कृष्ट भाषांसाठी तीन विद्यार्थ्यांची उत्कृष्ट वक्ता म्हणून निवड सुद्धा केली.एकूणच मराठी भाषा पंधरवडा निमित्याने गुलाम नबी आझाद उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेजद्वारे आयोजित वक्तृत्व स्पर्धा यशस्वी ठरली या बद्दल शाळेतील मराठी भाषा शिक्षक सैय्यद सलमान सरांचे व शाळेच्या शैक्षणिक प्रगती बाबत मुख्याध्यापक मोहम्मद सादिक शेख सरांचे आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी कौतुक केले आणि शुभेच्छा दिल्या.

# मनस्वीची पन्नास किलोमिटरची गरुडझेप

**विदर्भ केसरी। ज्योतिबा पोटे मारेगांव**

मारेगांव तालुक्यासाठी भुषण ठरलेली सुवर्णकन्या मनस्वी विशाल पिंपरे या छोट्या स्केटिंग पटूने दि २४ जानेवारीला पांढरकवडा ते वणी स्केटिंग करित ५० किमी चे अंतर काही तासात पार करून "फिट स्पोर्ट अँन्ड युनिटीचा " संदेश देत मनस्वीच्या अंगी असलेली जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास काय करू शकतो याच मुर्तीमंत उदाहरण म्हणजे मुळच्या बोटोणीची सुवर्ण कन्या मनस्वी पिंपरे केवळ मारेगांव तालुक्याच भुषण नसून संपूर्ण देशासाठी तिच स्केटिंग भूषणावह ठरणार आहे, ५० किमीच्या स्केटींग दरम्यान तिचे मार्गात जागोजागी स्वागत करून पांढरकवडा , मारेगांव व वणी तालुक्यातील जनतेनी उत्साह द्विगुणित केला .




पुणे येथे स्केटिंग प्रशिक्षण घेणारी मनस्वी ही वयाची चार वर्षाची असताना आई वडिलांनी मनस्वीच्या उज्वल भविष्यासाठी कर्ज उचल करून मनस्वीला स्केटींग पटू बनविले, आंतरराष्ट्रीय खेळाडू प्रकारात कसी मान्यता मिळेल यासाठी मनस्वीचे वडील विशाल पिंपरे यांनी शासकीय व सामाजीक स्तरावर प्रयत्न करित अनेक सेवाभावी संस्थेशी संपर्क करित मनस्वीला ११९ सुवर्ण पदकाची मानकरी बनविले, तिला प्रशिक्षण देणारे मलजी सरांनी जागतिक शिखरावर नेण्याचा प्रयत्न कामी आला असून मनस्वीला राष्ट्रीय स्तरावर शेकडो पुरस्कार मिळाल्याने मनस्विचा आत्मविश्वास वाढून येत्या २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धेत भारता कडून स्थान मिळणार असल्याचा आत्मविश्वास मनस्वीच्या आई वडील व आजोबा तसेच संपूर्ण तालुका वासियांना आहे, तिला विशेष मदत मनसेचे नेते राजुभाऊ उंबरकर सोबत वणी मारेगांव मधिल अनेक नेते मंडळी व दानशुर व्यक्ती मत्वानी केली असून मनस्वीच्या उज्वल भविष्या साठी सदैव मदतीचा हात देण्याच वचन त्यांनी दिले आहे, ५० किमी स्केटिंगचा समारोप वणी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मनस्वीच्या महा सत्कार करून करण्यात आला

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY

चंद्रपूर

GOOD MORNING

## हळदी-कुंकवासाठी निघालेल्या दोन बहिणींचा अपघाती मृत्यू

नागपूर-भंडारा महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात दोन सख्ख्या बहिणींचा मृत्यू झाला आहे. हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमासाठी जात असताना एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. मृतांमध्ये २६ वर्षीय अलिशा अनिकेत मेहर (भूगाव, कामठी) आणि २७ वर्षीय मोनाली दिनेश्वर घाटोळे (तायगाव खैरी, सौसर, मध्य प्रदेश) यांचा समावेश आहे. या दुर्दैवी घटनेने दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अलिशा मेहर यांचे लग्न सात महिन्यांपूर्वीच झाले होते. तर मोनाली घाटोळे यांचे लग्न येत्या २६ फेब्रुवारी रोजी निश्चित झाले होते. लग्नाची खरेदी आणि तयारी जोरात सुरू असतानाच काळाने त्यांच्यावर घाला घातला. हा अपघात नागपूर-भंडारा महामार्गावरील महालगावनजीक नागनदीच्या पुलावर भर दुपारी घडला. पिपळा डाक बंगला परिसरातून भूगाव येथे हळदी-कुंकवासाठी जात असताना पाठीमागून येणाऱ्या एका अज्ञात भरधाव वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, अलिशा मेहर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर गंभीर जखमी झालेल्या मोनाली घाटोळे यांनी रुग्णालयात नेत असताना वाटेतच अखेरचा श्वास घेतला. त्या नणंद-भावजय (मामे-आत्ते बहीण) होत्या. या अपघातानंतर महामार्गावर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. धडक देऊन पसार झालेल्या वाहनचालकाचा शोध घेण्यासाठी पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण नागपूर जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.a

## संक्षिप्त



### कूही तालुक्यातील किन्ही गावामध्ये सांस्कृतिक कला मंच मंडळ, ठाणा यांच्या वतीने राष्ट्रीय दुय्यम खडा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

तमाशा या लोककलेच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्यात आले. या कार्यक्रमातून गावकऱ्यांना व्यसनमुक्तीचा ठोस संदेश देत समाजात जागृती निर्माण करण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे, मंडळाचे पदाधिकारी, तसेच ग्रामपंचायतीचे सरपंच व सदस्य उपस्थित होते. गावातील महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या प्रबोधनात्मक तमाशामध्ये आस्टिक नरूले (चाळा), अणुज मांढरे (डोंगरमौदा), धर्मपाल डोंगरे (फेगड), मोंटी डान्सर, हेमंत डान्सर, तसेच ढोलक मास्तर वाद्य कलीचरन शेंडे (मुसळगाव) यांनी आपल्या कलागुणांनी कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले शाहीर दिलीप किरमरे, अमर तूर्रा गायन मंडळ ठाणा त्यांनी आपल्या प्रभावी गीतरचना व सादरीकरणातून दारू, गुटखा व इतर व्यसनांपासून दूर राहण्याचा संदेश देत उपस्थित जनतेला अंतर्मुख केले. लोककलेच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी या कार्यक्रमातून केले. अशा प्रकारचे उपक्रम ग्रामीण भागात सातत्याने राबविणे गरजेचे असून, या कार्यक्रमामुळे नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत सकारात्मक विचार निर्माण झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.




### प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला शहरात स्वच्छता मोहीम..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : सह सचिव तथा अभियान संचालक, केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय (MOHUA), भारत सरकार यांच्या निर्देशानुसार स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध मोहिमांद्वारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना ७७ वा प्रजासत्ताक दिन – २०२६ साजरा करण्याबाबत मार्गदर्शन सूचना प्राप्त झालेले आहेत. त्या अनुषंगाने नगर परिषदेच्या नगराध्यक्ष ॲड. सौ प्रणोती सागर निंबोरकर यांच्या सूचनांनुसार स्वच्छता विभागाच्या वतीने “Swachh Aadat se Swachh Bharat” (स्वच्छ आदत से स्वच्छ भारत) या संकल्पनेअंतर्गत शहरातील शासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे, स्मारके, मोकळ्या जागा तसेच इतर महत्त्वाच्या ठिकाणी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेद्वारे नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण करणे, स्वच्छ सवयी अंगीकारण्यास प्रोत्साहन देणे तसेच स्वच्छ व सुंदर शहर निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. नगराध्यक्ष ॲड. सौ प्रणोती सागर निंबोरकर यांनी नागरिकांना दररोज स्वच्छतेची सवय अंगीकारून “स्वच्छ आदत – स्वच्छ भारत” या मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे.

# 40 माओवाद्यांना कंठस्नान घालणा-या गडचिरोली पोलीस दलातील 31 अधिकारी- अंमलदारांना पोलीस शौर्य पदक, 394 जणांना पदोन्नती..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली: माओवादविरोधी लढ्यात निर्णायक भूमिका बजावणाऱ्या गडचिरोली पोलीस दलाच्या शौर्याला प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपतींकडून गौरवण्यात आले आहे. 2018 मध्ये बोरीया-कसनासूर परिसरात झालेल्या चकमकीत 40 माओवाद्यांना कंठस्नान घालणाऱ्या कारवाईतील अतुलनीय पराक्रमाची दखल घेत गडचिरोली पोलीस दलातील 31 पोलीस अधिकारी व अंमलदारांना "पोलीस शौर्य पदक" जाहीर करण्यात आले आहे. यासोबतच दलातील 394 पोलीस अंमलदारांना पदोन्नती देण्यात आली आहे.

25 जानेवारी 2026 रोजी जाहीर झालेल्या यादीत देशभरातील एकूण 121 पोलीस शौर्य पदकांपैकी 31 पदके गडचिरोली पोलीस दलास प्राप्त झाली आहेत. यापूर्वी 2025 च्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला 7 अधिकारी-अंमलदारांना शौर्य पदक मिळाले होते. मागील पाच वर्षांच्या कालावधीत गडचिरोली पोलीस दलास 3 शौर्य चक्र व 217 पोलीस शौर्य पदके प्राप्त झाल्याने हे दल देशपातळीवर ठळकपणे पुढे आले आहे. बोरीया-कसनासूर चकमकीचा ऐतिहासिक पराक्रम 22 एप्रिल 2018 रोजी बोरीया-कसनासूर परिसरात पोलीस व माओवाद्यांमध्ये झालेल्या तीव्र चकमकीत गडचिरोली पोलीस दलाने मोठे यश संपादन करत 40 माओवाद्यांना ठार केले होते. या कारवाईदरम्यान दाखवलेल्या शौर्य, धैर्य व रणनीतीपूर्ण कामगिरीमुळे संबंधित अधिकारी व अंमलदारांचा राष्ट्रपती शौर्य पदकासाठी गौरव करण्यात आला आहे.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अभिनंदन

■ शौर्य पदक व पदोन्नती प्राप्त पोलीस अधिकारी व अंमलदारांचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक अहेरी कार्तिक मधीरा व अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी. यांनी अभिनंदन करत त्यांच्या पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### ३९४ अंमलदारांना पदोन्नती, शहीद जवानांनाही सन्मान

■ गडचिरोली पोलीस दलातील 394 पोलीस अंमलदारांना पदोन्नती देण्यात आली असून त्यामध्ये 10 अंमलदारांना वेगवर्धित पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच 14 शहीद पोलीस अंमलदारांना मरणोत्तर पदोन्नती देत त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. यात 82 पोलीस हवालदारांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, तर 302 पोलीस नाईकांना पोलीस हवालदार पदी पदोन्नती देण्यात आली आहे.



### शौर्य पदक प्राप्त अधिकारी - अंमलदार

■ पोनि. अमोल फडतरे, पोउपनि. मधुकर पोचय्या नैताम, पोउपनि. वासुदेव राजम मडावी, सफौ विलास मारोती पोरतेट, पोहवा संतोष वसंत नैताम, पोहवा विश्वनाथ सन्यासी सडमेक, पोहवा ज्ञानेश्वर सदाशिव तोरे, पोहवा दिलीप वासुदेव सडमेक, पोहवा रामसू देऊ नरोटे, पोहवा आनंदराव बाजीराव उसेंडी, पोहवा राजु पंडित चव्हाण, पोहवा मोहन लच्छु उसेंडी, पोहवा संदिप गणपत वसाके, पोना अरुण कैलास मेश्राम, पोना सुधाकर बिटोजी वेलादी, पोना नितेश गंगाराम वेलादी, पोना विश्वनाथ लक्ष्मण मडावी, पोना कैलास देवू कोवासे, पोना हरिदास महारु कुलयेटी, पोना किशोर चंटी तलांडे, पोना अतुल भगवान मडावी, पोना अनिल रघुपती आलाम, पोना नरेंद्र दशरथ मडावी, पोना आकाश अशोक ऊईके, पोना घिस्सु वंजा आत्राम, पोना राजु मासा पुसाली, पोना महेश दत्तुजी जाकेवार, पोना रुपेश रमेश कोडापे, पोना मुकेश शंकर सडमेक, पोना योगेंद्रराव उपेंद्रराव सडमेक व पोअं कारे ईरपा आत्राम यांचा समावेश आहे.

# महाशिवरात्री यात्रेसाठी मार्कंडा देव येथे समन्वयात्मक आढावा बैठक

## भाविकांच्या सोयीसुविधांना प्राधान्य देण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

विदर्भ केसरी / विनोद सेलोटे

गडचिरोली,( दि.२५):- विदर्भाची काशी म्हणून ओळख असलेल्या मार्कंडा देव येथे महाशिवरात्री निमित्ताने दि. १५ फेब्रुवारी २०२६ पासून भरणाऱ्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर भाविकांना अधिकाधिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी दिले. मार्कंडा देव येथील धर्मशाळेत शिवरात्री निमित्त मार्कंडादेव, पळसगाव व चपराळा येथे आयोजित करण्यात आलेल्या यात्रेसंबंधाने नियोजनाचा आढावा बैठकीच्या जिल्हाधिकारी यांनी घेतला. यावेळी ते बोलत होते. आमदार डॉ. मिलिंद नरोटे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, उपविभागीय अधिकारी एम. अरूण, निवासी उपजिल्हाधिकारी आशिष वानखेडे, पोलीस व महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की, राज्यासह इतर राज्यांतून मोठ्या संख्येने भाविक मार्कंडा देव यात्रेला येतात. त्यामुळे भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची विशेष काळजी घेत सर्व विभागांनी प्रशासनाला सहकार्य करावे. यात्रा यशस्वी होण्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासन यांचा समन्वय महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी नमूद केले. जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी यात्रेच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेत सर्व विभागांना आवश्यक सूचना दिल्या. यात्रेच्या कालावधीत केंद्रीकृत नियंत्रण कक्ष उभारणे, सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित ठेवणे तसेच पोलीस विभागाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी चोख बंदोबस्त ठेवावा, असे त्यांनी निर्देश दिले. तात्पुरत्या दुकानांसाठी एक खिडकी योजनेअंतर्गत परवाने देण्याची कार्यवाही सुलभ करावी, पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी तसेच सर्व ग्रामपंचायतींनी स्वच्छतेबाबत योग्य व नियमित कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले.

आपत्ती व्यवस्थापन विभाग, चामोर्शी नगर पंचायत व अग्निशमन विभाग यांच्यामार्फत अग्निसुरक्षा, स्वच्छता व मोबाईल शौचालयांची व्यवस्था करण्यात यावी. सार्वजनिक बांधकाम विभागाने यात्रेपूर्वी रस्त्यांची दुरुस्ती व डागडुजीची कामे तातडीने पूर्ण करावीत. आरोग्य विभागाने वैद्यकीय पथके, औषधोपचार सुविधा व रुग्णवाहिका सज्ज ठेवाव्यात. तसेच विद्युत विभाग, वनविभाग, अन्न व औषधे प्रशासन, पुरातत्त्व विभाग, मंदिर ट्रस्ट, चिचडोह बॅरेज प्रशासन व एस.टी. महामंडळ आदी सर्व संबंधित विभागांनी आवश्यक त्या ठिकाणी आपापले नियंत्रण कक्ष उभारून भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. या सर्व उपाययोजना यात्रा सुरू होण्यापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीदरम्यान उपस्थित नागरिकांनी यात्रेसंदर्भात विविध सूचना मांडल्या. या सूचनांचा सकारात्मक विचार करून प्रशासनास सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा व आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी केले. तहसीलदार प्रशांत घोरूडे यांनी प्रस्ताविकेतून यात्रेच्या आयोजनाची व सोयी सुविधांची माहिती दिली. बैठकीला विविध विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.








दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू TODAY
गडचिरोली GOOD MORNING

## ज्येष्ठ महिलेचा भरधाव वाहनाच्या धडकेत मृत्यू:पुण्यात पाषाण रस्त्यावर घटना

पुण्यात पाषाण रस्त्यावर राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या प्रवेशद्वारासमोर भरधाव वाहनाच्या धडकेत एका ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाला आहे. फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडलेल्या या महिलेला धडक दिल्यानंतर वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. आशा विजयकुमार पाटील (वय ७३, रा. अभिमानश्री हाऊसिंग सोसायटी, पाषाण रस्ता) असे मृत महिलेचे नाव आहे. याप्रकरणी अतुल विजयकुमार पाटील (वय ५२) यांनी चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी पसार झालेल्या वाहनचालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आशा पाटील दररोज सायंकाळी फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडत असत. पाषाण रस्त्यावरून जात असताना राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या (एनसीएल) प्रवेशद्वारासमोर त्यांना भरधाव वाहनाने धडक दिली. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचारांपूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे यांनी घटनास्थळी भेट दिली असून, पसार झालेल्या वाहनचालकाचा शोध सुरू आहे. दरम्यान, पुणे-सोलापूर महामार्गावरील थेऊर फाटा परिसरातही एका पादचारी तरुणाचा भरधाव वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला. २३ जानेवारी रोजी मध्यरात्री दीडच्या सुमारास ही घटना घडली. मृत तरुणाची ओळख अद्याप पटलेली नाही. तो सुमारे ३५ वर्षांचा असावा असा अंदाज आहे. या प्रकरणीही अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संक्षीप्त

### गोगांव नागोबा यात्रेला मा.खा. डॉ. अशोकजी नेते यांची सदिच्छा भेट,व भाविकांना शुभेच्छा..!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**



गडचिरोली : २५ जानेवारी २०२६ रोजी गोगांव (अडपल्ली) ता.जि.गडचिरोली येथील प्रसिध्द नागोबा देवस्थान यात्रेला माजी खासदार तथा भाजपा अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री मान. डॉ. अशोकजी नेते यांनी पूजाअर्चा करत भेट देत नागोबा देवाचे भक्तिभावाने दर्शन घेतले. या पावन नागोबा यात्रेच्या निमित्ताने मा.खा.डॉं. नेते यांनी उपस्थित असलेल्या सर्व भाविक भक्तांना त्यांनी यात्रेच्या हार्दिक शुभेच्छा देत नागोबा देवाच्या कृपेने सर्व भक्तांचे जीवन सुख-समृद्धीने भरून जावो, अशी सदिच्छा त्यांनी यावेळी व्यक्त केली. या प्रसंगी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अरुणजी हरडे, अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हा महामंत्री सलिम शेख,राकेश राचमलवार, यांच्यासह परिसरातील मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते. संपूर्ण यात्रास्थळी भक्तिभाव, श्रद्धा व उत्साहाचे वातावरण अनुभवायला मिळाले.

# धानोरा-मुरुमगाव मार्गावर दोन चारचाकींची समोरासमोर भीषण धडक, आश्रमशाळेचा विद्यार्थी ठार, तर एक महिला जखमी..!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

धानोरा : धानोरा-मुरुमगाव मार्गावरील जपतलाई गावाजवळ आज रविवार 25 जानेवारी 2026 रोजी दुपारी सुमारे 1.30 वाजता दोन चारचाकी वाहनांची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात घडला. या दुर्घटनेत आश्रमशाळेतील 12 वर्षीय विद्यार्थी ठार झाला असून एक महिला गंभीर जखमी झाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील येरंडी येथील मालिनीताई दहिवडे अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांना 26 जानेवारीच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी घेऊन जाण्यासाठी स्कॉर्पिओ वाहन जपतलाई मार्गे गोडलवाहीकडे निघाले होते. त्याचवेळी धानोऱ्याकडून येणारी टाटा कार (क्रमांक CG 04 PG 7896) जपतलाईच्या नागमोडी वळणावर स्कॉर्पिओला समोरासमोर धडकली. धडकेनंतर स्कॉर्पिओ पलटी झाली, तर टाटा कार झाडावर आदळली. या अपघातात आश्रमशाळेचा विद्यार्थी रोशन राजू किंरंगे (वय 12), रा. गोडलवाही, ता. धानोरा याचा जागीच मृत्यू झाला. टाटा कारमध्ये पती-पत्नी व मुलगा प्रवास करत होते. त्यापैकी निधी गुप्ता (वय 43), रा. मोहला, छत्तीसगड या महिला जखमी झाल्या असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलीस व मदत पथक घटनास्थळी दाखल झाले. अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## आदर्श महाविद्यालय येथे गोंडवाना विद्यापीठ स्तरीय अंतर महाविद्यालय क्रॉस कंट्री स्पर्धेचे यशस्वी आयोजन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : स्थानिक आदर्श कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय देसाईगंज येथे गोंडवाना विद्यापीठ स्तरीय अंतर महाविद्यालय क्रॉस कंट्री स्पर्धेचे आयोजन यशस्वीपणे करण्यात आले. हिरवी झंडी दाखवून या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे सचिव मोतीलालजी कुकरेजा साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.

स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सदस्य डॉ. शंकर कुकरेजा, डॉ. एच.एम. कामडी, प्राचार्य, विठ्ठलराव बनपूरकर महाविद्यालय, मालेवाडा, आदर्श जुनियर कॉलेजचे प्राचार्य दामोधर शिंगाडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ श्रीराम गहाणे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या अंतर महाविद्यालय क्रॉस कंट्री स्पर्धेत (मुले) मध्ये प्रथम क्रमांक J.S.B. महाविद्यालय. घोट, द्वितीय क्रमांक आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा तर तृतीय क्रमांक शिवाजी महाविद्यालय. गडचिरोली यांनी पटकाविला. तर या स्पर्धेत मुली मध्ये प्रथम- आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा, द्वितीय -महात्मा गांधी महाविद्यालय. आरमोरी, तृतीय - शिवाजी महाविद्यालय. गडचिरोली यांनी बाजी मारली. तसेच राष्ट्रीय स्तरावर गोंडवाना विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मुलांच्या गटा मध्ये रोशन बोदलकर, यश भांडेकर, रोहन भुरसे- जे. एस. बी महा. घोट, रीमीन घोडरे - कर्मवीर महा. मुल, सौरभ उन्नाडे -महात्मा ज्योतिबा फुले महा., आष्टी, साईनाथ पूंगारी - आनंद निकेतन महा., वरोरा यांची निवड झाली. तर मुलींच्या गटामध्ये कु. मुन्नी मडावी, कु. लाली उसेंडी, समिक्षा भोयर, आनंद निकेतन महा., वरोरा, साक्षी पोलोजवार, एस. पी. महा. चंद्रपूर, प्रियंका मेश्राम, आदर्श महा. वडसा, प्रतिक्षा भाकुले बनपुरकर महा. मालेवाडा यांची निवड करण्यात आली. सर्व विजेत्यांना पुष्पगुच्छ व स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा विभाग प्रमुख डॉ राजू चावके यांनी अथक परिश्रम केले. स्पर्धेचे बाह्य परिक्षक व सहाय्यक म्हणून डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, एम.जी. महा. आरमोरी, डॉ. उदय मेंडुलकर, आर. टी. एम. महा. चिमूर, डॉ. राजीव गोरे, शिवाजी महा. गडचिरोली, प्रा. संगीता बांबोडे व बास्केटबॉलचे नॅशनल अंपायर श्री. सी. पी. जेम्स यांचे सहकार्य महत्त्वपूर्ण ठरले. बक्षीस वितरण समारंभाचे सुत्र संचालन प्रा अमोल बोरकर तर प्रा डॉ. राजू चावके यांनी आभार मानले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आदर्श महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.







## संविधानाची ताकद,राष्ट्राची दिशा, सुरेश कन्नमवार यांच्या लेखणीतून...

### 26 जानेवारी 2026 प्रजासत्ताक दिन



26 जानेवारी हा भारतीय लोकशाहीचा आत्मसन्मान दर्शवणारा दिवस आहे. 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय संविधान अंमलात येऊन भारताने स्वतःला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून घोषित केले. हा दिवस केवळ राष्ट्रीय उत्सव नसून भारतीय राज्यघटनेतील मूल्यांचे स्मरण करून देणारा महत्वाचा क्षण आहे. भारतीय संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी दिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेले हे संविधान सामाजिक समतेचा पाया आहे. विविधतेने नटलेल्या भारताला एकसंध ठेवण्याचे सामर्थ्य या संविधानात आहे. कायद्यापुढे सर्व समान आहेत, ही भूमिका भारतीय लोकशाहीची खरी ओळख ठरते. प्रजासत्ताक दिनानिमित्त राजधानी नवी दिल्ली येथे होणारा भव्य संचलन सोहळा देशाच्या संरक्षण क्षमतेचे, शिस्तीचे आणि सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडवतो. तिन्ही सैन्यदलांचा पराक्रम, विविध राज्यांच्या झांक्या आणि शौर्य पुरस्कारप्राप्त बालवीरांची उपस्थिती राष्ट्रभक्तीची भावना अधिक दृढ करते. 2026 साली भारत जागतिक पातळीवर वेगाने प्रगती करत आहे. विज्ञान व तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, डिजिटल व्यवस्था, पायाभूत सुविधा आणि संरक्षण क्षेत्रात भारताने उल्लेखनीय टप्पे गाठले आहेत. आत्मनिर्भरतेच्या दिशेने देशाची वाटचाल सुरू असून, तरुणाई या परिवर्तनाची प्रमुख शक्ती ठरत आहे. मात्र प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सवापुरता मर्यादित नसावा. संविधानाने दिलेल्या अधिकारांबरोबरच नागरिकांच्या कर्तव्यांची जाणीव होणे तितकेच आवश्यक आहे. सामाजिक सलोखा जपणे, कायद्याचे पालन करणे, लोकशाही मूल्यांची रक्षा करणे आणि भ्रष्टाचाराविरुद्ध ठाम भूमिका घेणे ही काळाची गरज आहे. आजच्या बदलत्या काळात संविधानातील मूल्ये अधिक अर्थपूर्ण ठरतात. समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांवर आधारित भारत घडवणे ही सामूहिक जबाबदारी आहे. प्रजासत्ताक दिन 2026 च्या निमित्ताने, संविधानाचा आदर राखत लोकशाही अधिक सशक्त करण्याचा संकल्प प्रत्येक नागरिकाने करावा, हीच या दिवसाची खरी सार्थकता आहे.

**-सुरेश सुखदेव कन्नमवार**
मु.कोंडेखल पो.केरोडा
ता.सावली जिल्हा.चंद्रपूर - 441225
मो.नं. - 8805113505






## पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

### खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

**नागपूर**
जिल्हा प्रतिनिधी
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


**अमरावती**
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरूड, इतर

**अकोला**
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

**यवतमाळ**
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

**बुलढाणा**
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

**चंद्रपूर**
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



**आकर्षक वेतन**

संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यांनी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअ‍ॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**